उंच माझा झोका पुरस्कार | क्षितिज पटवर्धन | स्क्रीप्ट ६.०

UNCH MAZA ZOKA PURASKAR 2015

---------------------------------------- SHOW START----------------------------------

----------------------------------------ANCHOR LINK 1-------------------------------

**अतुलः** नमस्कार, फेअर अॅण्ड लवली प्रस्तुत 'उंच माझा झोका पुरस्कार २०१५' को पावर्ड बाय कोलगेट डेन्टल क्रीम अॅण्ड स्पेशल पार्टनर गिटस इंन्स्टंट मिक्सेस या कार्यक्रमात मी अतुल कुलकर्णी,

**सोनालीः** आणि मी, सोनाली कुलकर्णी,

**दोघेः** आपलं मनापासून स्वागत करतो.

**अतुलः** या पुरस्कारांचं हे तिसरं वर्ष. आज या कार्यक्रमात आपण करणार आहोत स्त्री शक्तीचा गौरव. विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या असामान्य स्त्रियांचा सन्मान! भावना दरवर्षीचीच, स्वरुप मात्र आणखी सुंदर, आणि अधिक काळानुरुप! या सोहळयाला सुरुवात करण्यापूर्वी पुरस्कार समितीचे सल्लागार ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर,

**सोनालीः** मुंबई विदयापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख

**अतुलः** ज्येष्ठ साहित्यिक विजया राजाध्यक्ष यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो!
आमचे प्रेझेंटींग स्पॉन्सर फेअर अॅण्ड लवली, को पावर्ड बाय कोलगेट डेन्टल क्रीम! स्पेशल पार्टनर गिटस इन्स्टंट मिक्सेस, असोसिएट स्पॉन्सर्स डीएसके ड्रीम सिटी, संतूर सोप, रेलिस्प्रे, पाँडस ड्रिमफ्लॉवर टाल्क, केप्र फूडस, पी एम सी बँक, महिंद्रा सेंच्युरो या सगळयांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.

## (अँकर्स मध्यातून पोडीयमवर येतील.)

**सोनालीः** स्त्रियांच्या बाबतीत बोलायचं झालं तर, गेल्या वर्षा दीड वर्षात काय काय नाही झालं? एकीकडे प्रचंड जिददीनं सायना नेहवाल बॅडमिंटनच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचली तर दुसरीकडे दहशतवादयांविरुध्द धैर्यानं उभ्या राहीलेल्या मलाला युसूफझाई या शाळकरी मुलीनं, शांतीचा संदेश देत नोबेल पुरस्कार मिळवला. गेली सहा दशकं जगभरातील महिलांचा आवाज बनलेल्या माया अँजलू

यांच्यासारख्या प्रतिभावंत कवयित्रीनं जगाचा निरोप घेतला तर फोर्ब्ज मासिकाच्या जगातील सर्वात प्रभावशाली शंभर महिलांच्या यादीत चार भारतीय स्त्रियांनी स्थान पटकावलं.

**<u>अतुलः</u>** जगभरातल्या या महिलांच्या कार्याला सलाम करताना आपल्या आसपास असलेल्या अशाच असामान्य महिलांच्या कर्तृत्वाला अभिवादन करायलाच हवं नाही का? तेव्हा आम्ही इतकच सांगू की, हा संपूर्ण कार्यक्रम नीट लक्ष देऊन पहा. कारण तुमच्या खेडयातली, जिल्हयातली किंवा शहरामधली अतिशय
सामान्य वाटणारी एखादी स्त्री किंवा मुलगी हया पुरस्काराची मानकरी असू शकते.

**<u>सोनालीः</u>** उंच माझा झोका पुरस्कारांची सुरुवात करुया अस्सल लोककलेच्या अविष्कारानं.
आधुनिक विचारांची कास धरताना पारंपरिक मूल्य आणि कला यांची जपणूकही तेवढीचं महत्वाची.
लोककला या विषयावर डॉक्टरेट मिळवणारे, मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीचे विभाग प्रमुख असलेले प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे आणि त्यांचे सहकारी आपल्या कार्यक्रमाची दमदार सुरुवात करतायत.
सादर आहे खंडोबाचं जागरण, वाघ्या मुरळी!

**(ANCHORS EXIT)**

-----------------------------------------ACT 1 STARTS----------------------------------

-----------------------------------------ACT 1 ENDS------------------------------------

------------------------------AWARD SET 1 STARTS-----------------------------------

## साहित्यः

**अतुलः** फेअर अॅण्ड लवली प्रस्तुत 'उंच माझा झोका पुरस्कार २०१५' को पावर्ड बाय कोलगेट डेन्टल क्रीम! चला वळूया आजच्या पहिल्या पुरस्काराकडे. हे असं वळूया वगैरे म्हणलं की लोक एकदम सरसावतात! वातावरणात अचानक एक अलर्टनेस येतो. (हसत) असो, मी नुकतीच गुलझार साहेबांची किताबे नावाची सुंदर कविता वाचली. किताबे झाँकती है बंद अलमारीयों के शीशोंसे... बडी हसरत से ताकती है, ती कविता ऐकली आणि सहज घरातल्या पुस्तकांच्या रॅककडे लक्ष गेलं. सगळीच्या सगळी डोकावतायत आपल्याकडे बघून असं वाटलं. त्यातली बरीच पुस्तकं वाचलेली होती, काही उत्साहाच्या भरात विकत घेतलेली होती, काही गिफ्ट मिळाली होती. पण क्षणभर मनात विचार आला. आपल्या आयुष्यात पुस्तकं नसती तर काय झालं असतं?

**सोनालीः** खरंच आहे! मला वाटतं पुस्तक हे प्रत्येकासाठी फार वेगळं काहीतरी घेऊन येतं. मला अजूनही आठवतं की 'डायरी ऑफ अॅन फ्रँक' मधून चौदा पंधरा वर्षाची अॅन फ्रँक मला भेटली होती. नाझी छळछावणीच्या एक न एक खुणा जिवंत करणारी, आणि तरीही शेवटी 'डिस्पाईट एव्हरीथिंग, आय बिलीव्ह पीपल आर रिअली गुड अॅट हार्ट' असं म्हणणारी.

**अतुलः** तशीच पुस्तकातूनच मला नुकतीच मलाला युसूफझाई भेटली. तालिबानी संघटनांनी मुलींना शिकायला बंदी घातलेल्या स्वात खोऱ्यात, स्वतःच्या जीवावर उदार होऊन शिकणारी १३ १४ वर्षांची मुलगी. ती एक दिवस शाळेतून परत येताना तिच्यावर निदर्यपणे गोळया झाडल्या गेल्या. त्यातून वाचलेल्या मलालानं आपली लढाई आंतरराष्ट्रीय पातळीवर नेली आणि आजवरची सगळयात कमी वयातली नोबेल पुरस्काराची मानकरी ठरली. बघ ना, अॅन फ्रँक आणि मलाला, दोन्ही मुली इतक्या भिन्न काळात जन्माला आलेल्या पण दहशतीच्या छायेखाली वावरुनही जगभर आपला आवाज त्यांनी आपला आवाज पोचवला.

**सोनालीः** अशा कित्येक जणी आपल्याही देशात आहेत, ज्यांच्यावर प्रचंड बंधनं आहेत, ज्यांना रोज कुठल्या ना कुठल्या स्वरुपात दहशतीला सामोरं जावं लागतं, ज्यांना तोंडातून 'ब्र' काढायचीही परवानगी नसते.

**अतुलः** आजूबाजूच्या महिलांना आपल्या सशक्त लिखाणातून ही लाखमोलाची हिमंत देणाऱ्या कविता महाजन. आजवरच्या साहित्यकार्यासाठी आणि 'कुहू' या त्यांच्या मल्टीमिडीया नॉव्हेल साठी, त्यांना यंदाचा साहित्याचा उंच माझा झोका पुरस्कार प्रदान केला जातोय. त्यांचं मराठी भाषेतील 'कुहू' हे भारतातील पहिलं मल्टीमिडीया नॉव्हेल आहे. पुस्तकावर आधारीत २१० मिनिटांचा व्हीडीओ, मोशन ग्राफिक्स,

२२ गीतं, चित्र, फोटोज, ॲनिमेशन, स्पेशल इफेक्टस, कॅलिग्राफी या सगळयांनी मिळून कुहू हे मेगा प्रोजेक्ट तयार झालंय! हा पुरस्कार देण्याआधी पाहूया त्यांचा योगदानाची एक ध्वनिचित्रफित.

## (AV)

**अतुलः** या वर्षीचा साहित्याचा उंच माझा झोका पुरस्कार प्रदान करण्यासाठी मी रंगमंचावर आमंत्रित करतो

प्रख्यात नाटककार, आणि मुंबई विदयापीठाचे नाटयशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक शफाअत खान यांना.

हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी कविता महाजन यांना रंगमंचावर येण्याची विनंती करतो.

**(पुरस्कार प्रदान)**

मी कविता महाजन यांना विनंती करतो, की त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करावं!

**(मनोगत)**

**धन्यवाद!**

# <u>समाजकार्य</u>

**<u>सोनालीः</u>** कमाल आहे, मल्टीमिडीया नॉवेल सारखा अभिनव प्रकार आपल्या भाषेत सुरु झालाय. टेक्नॉलॉजी किती झपाटयानं विस्तारतेय ना?

**<u>अतुलः</u>** हो नक्कीच. पण तिचा वापर कसा करायचा हे फार महत्वाचं आहे.

**सोनालीः** म्हणजे?

**<u>अतुलः</u>** म्हणजे उदाहरणादाखल, मला परवा माझ्या एका मैत्रिणीनं सांगितलं की

त्यांच्या एनजीओनं गेल्या काही महिन्यात फेसबुकवर जोरदार प्रमोशन केलं, सगळीकडे त्या एनजीओच्या पोस्ट, फोटोज दिसायला लागले. हे केल्यावर मदतीचा ओघ वाढेल अशी अपेक्षा होती पण झालं उलटंच, हे केल्यापासून छोटया स्वरुपात मिळणाऱ्या देणग्या आटल्या, कारण आपण फक्त लाईक केलं किंवा शेअर केलं म्हणजेच समाजसेवा केली असं लोकांना वाटायला लागलं.

**<u>सोनालीः</u>** बापरे!

**<u>अतुलः</u>** ऑनलाईन जग इंटरॲक्शनसाठी छान आहे, पण त्याही पुढे जाऊन सहभाग, इनव्हॉल्व्हमेंट नावाचा एक प्रकार असतो हे ही लक्षात घ्यायला हवं. समाजकार्य करणाऱ्या ठिकाणी नुसतं 'सोशल टुरिझम' ला जाऊन सामाजिक कार्य होत नाही हे कधी कळणार आपल्याला? अपडेट, पोस्ट, लाईक आणि शेअर या चक्रातून बाहेर पडून मदतीचा हात पुढे करायला हवा, कारण त्याची गरज समाजाला जास्त आहे.

**<u>सोनालीः</u>** या सगळयाच्या पलिकडे जाऊन आजच्याही काळातही निस्वार्थीपणे समाज सेवा करणारी लोकं आहेत, कुठल्याही अपेक्षेशिवाय इतरांचं आयुष्य सुंदर बनवणारी माणसं आहेत. समाजातल्या अंधारलेल्या कोपऱ्यांना उजळून टाकणाऱ्या, या छोटया छोटया ज्योती तितक्याच महत्वाच्या आहेत. मी सांगतेय आपल्या सामाजिक क्षेत्रातल्या पुरस्कारार्थी अमरावतीच्या रझिया सुलताना यांच्याबददल! तृतीयपंथी, समलैंगिक, वेश्या आणि महिला कैदी अशा सगळयांसाठी झटून काम करणाऱ्या रझिया सुलताना. गेली तीस वर्ष महिलांच्या पुनर्वसनाच्या कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिलंय! रझिया ताईंबददल सांगताना मुन्नवर राणा साहेबांच्या दोन ओळी आठवतायत. 'ऐ अंधेरे देख ले तेरा मुंह काला हो गया, माँ ने आँखे खोली घर मे उजाला हो गया!'

मला खात्री आहे रझियाजी, असंख्य वंचितांची तुम्ही आई झाला आहात. आज तुमच्या बददल त्यांच्या मनात हीच भावना असेल,पाहूया त्यांच्या कामाची ही ध्वनिचित्रफित!

## (AV)

**सोनाली:** हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यासाठी मी रंगमंचावर आमंत्रित करतो, गेली चार दशकं महिलांच्या प्रश्नांविषयी आवाज उठवणाऱ्या,'स्त्री मुक्ती संघटनेच्या अध्यक्षा' ज्योती म्हापसेकर यांना.

मी रझियाताईंना विनंती करते, की त्यांनी पुरस्कार स्वीकारण्यासाठी रंगमंचावर यावं!

(**पुरस्कार प्रदान**)

मी रझिया सुलताना यांना विनंती करतो, की त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करावं!

**(मनोगत)**

**सोनाली:** धन्यवाद!

--------------------------------AWARD SET 1 ENDS-------------------------------------

--------------------------------ANCHOR LINK 2 STARTS -------------------------------

**<u>अतुलः</u>** तू आत्ता मुनव्वर राणा साहेबांची कविता ऐकवलीस आणि आईवरच्या त्यांच्या कविता एकदम आठवल्या. “इस तरह वो मेरे गुनाहोंको धो देती है, बहोत गुस्से मे होती है, तो माँ रो देती है!”

**<u>सोनालीः</u>** व्वा! दुसरीकडे फ. मु. शिंदे म्हणतात “आई म्हणजे एक नाव असतं, घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं!” आई, दोन अक्षरं, पण एक मूलभूत प्रेरणा. अशाच आईच्या कविता घेऊन आपल्यासमोर आता येतायत ‘प्राध्यापक प्रशांत मोरे’.

-----------------------------------ACT 2 STARTS -----------------------------------------

-------------------------------------ACT 2 ENDS----------------------------------------

------------------------------AWARD SET 2 STATRS-----------------------------------

## (COLGATE DENTAL CREAM INTEGRATION)

## (शिक्षण)

**अतुलः** कोलगेट डेंटल क्रीम सारखा अग्रगण्य ब्रँड या पुरस्कार सोहळयात आमच्या पाठीशी आहे या बददल आम्हाला अतिशय आनंद वाटतो. या कार्यक्रमासाठी येताना घरुन निघालो ना सोनाली , तेव्हा रस्त्यात जनरल पुढच्या गाडयांच्या मागे काय काय लिहीलंय हे पहात होतो. रस्ताभर नुसती करमणूक. भन्नाट काय काय लिहीतात लोकं!

**सोनालीः** खरंच ! भाषिक वैशिष्टयाचे नमुनेच असतात एकेक! बघतोस काय मुजरा कर, मम्मा सेज नो गर्लफ्रेंडस, एकाने ट्रकच्या मागे लिहीलं होतं हॉर्न धीरे बजाये क्योंकी हमारा देश सो रहा है आणि टेम्पोच्या मागे लिहीलं होतं, मै भी बडा होके ट्रक बनूंगा.

**अतुलः** पण सध्या एक वाक्य मात्र सगळीकडे दिसतं. 'मुलगी शिकली, प्रगती झाली!', बारा ते तेरा गाडयांच्या मागे मी पाहीलं. मग जाणवलं, मुलगी शिकली प्रगती झाली ठीक आहे पण ती शिकत असताना तिला कधी विचारतो का आपण, की तुला नीट मनासारखं शिकता येतंय का गं? एक व्यवस्था म्हणून आपण तिच्या बेसिक सुविधा, स्वातंत्र्य, याकडे लक्ष तरी देतोय का? मला खात्री आहे, या पुढच्या पुरस्कारार्थीची गोष्ट जर आम्ही तुम्हाला सांगितली, तर 'मुलगी शिकली प्रगती झाली' या वाक्याचा अर्थ तुमच्यासाठी कायमचा बदलून जाईल!

**सोनालीः** दहावी, बारावीचं किंवा कुठलही शिक्षण घेणारे जे कोण विदयार्थी मित्र हा कार्यक्रम पहात असतील लक्ष देऊन ऐका! या मुलीकडे तुमच्यासारखी अभ्यासाला जागा नाही, टेबल खुर्ची नाही, लेटेस्ट कंपास बॉक्स नाही, दिमतीला पालक दुधाचा ग्लास किंवा भिजवलेले बदाम घेऊन उभे नाहीत, तिच्याकडे आहे ती फक्त दुर्दम्य इच्छा! शिकण्याची. जुन्याकाळी महापुरुषांनी रस्त्यांवरच्या दिव्याखाली अभ्यास केल्याचे दाखले वारंवार देतो आपण, पण आज आपल्यात सुध्दा एक अवघी सोळा वर्षाची मुलगी आहे जी स्मशानतल्या घरात रहाते आणि जळणाऱ्या चितेच्या उजेडावर आपला अभ्यास करते.

**अतुलः** स्मशानातलं छोटसं घर, पाच भावंडं, घरात नीटसा उजेड नाही,जागा नाही आणि समोर जळणारी प्रेतं. या सगळया वातावरणातही मनापासून अभ्यास करुन ती दहावीच्या परीक्षेला बसली आणि तिला किती

टक्के मिळालेत माहीतेय?

**<u>सोनाली:</u>** साठ? सत्तर? पंच्याहत्तर?

**<u>अतुल:</u>** एक्याण्णव पॉईंट दोन. आईवडलांच्या कष्टामुळे हे यश मिळाल्याचं सांगणारी पूजा घनसरवाड,  खरोखर आजच्या विदयार्थ्यांपुढचा आदर्श आहे. पाहूया तिच्या जगण्याची आणि जिददीची कहाणी!

## <u>(AV)</u>

**<u>सोनाली:</u>** मुलगी शिकली बरोबर आहे पण अशा शिकणाऱ्या मुलींच्या प्रगतीला हातभार लावणं ही समाज म्हणून आपली सुध्दा जबाबदारी आहे. हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी रुरल रिलेशन्सचे प्रमुख, आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी, तिथल्या विदयार्थ्यांसाठी मोलाचं काम करणारे, प्रदीप लोखंडे यांना मी रंगमंचावर यायची विनंती करते. मी पूजा घनसरवाड हिला हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी रंगमंचावर आमंत्रित करते.

**(पुरस्कार प्रदान)**

पूजा तुला विनंती आहे, तू तुझं मनोगत व्यक्त करावं!

**(मनोगत)**

**धन्यवाद**!

## <u>(ANCHORS  STAY)</u>

**(FAIR AND LOVELY FOUNDATION INTEGRATION)**

**अतुलः** पूजा सारख्याच हजारो मुलींना स्वतःची स्वप्नं पूर्ण करण्याची उमेद देतं फेअर अॅण्ड लवली फाऊंडेशन. मुलींना सुंदर बनवतानाच सक्षमही बनवण्याचा हा अभिनव उपक्रम २००३ सालापासून सुरु आहे. या फाऊंडेशन च्या माध्यमातून दरवर्षी गुणवंत विदयार्थीनींना १ लाख रुपयांपर्यंत स्कॉलरशिप दिली जाते.

**सोनालीः** मित्रांनो आजपर्यंत फेअर अॅण्ड लवली फाऊंडेशनच्या माध्यमातून १००० हून जास्त मुलींना आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी साहाय्य मिळालं आहे. मनापासून कौतुक या अभिनव फेअर अॅण्ड लवली फाऊंडेशन साठी!

(ANCHORS STAY)

## विज्ञानः

**सोनालीः** अतुल तू ग्रॅव्हीटी नावाचा सिनेमा पाहीलास का? गेल्या वर्षी आला होता!

**अतुलः** हो फार सुंदर होता. अंतराळात अडकलेली एक स्त्री, स्वतःच्या जिददीनं मार्ग काढत पृथ्वीपर्यंत कशी येऊन पोहोचते याची थरारक गोष्ट होती यात.

**सोनालीः** हीच गोष्ट मी माझ्या शेजारच्या ८१ वर्षाच्या देशपांडे आज्जीना सांगीतली.

**अतुलः** (हसून) तू ग्रॅव्हीटीची स्टोरी शेजारच्या आज्जींना सांगीतलीस? मग काय म्हणाल्या त्या?

**सोनालीः** मला म्हणाल्या चल मला पण बघायचाय. मग आम्ही दोघी आयमॅक्स मध्ये थ्री डी गॉगल लावून पिक्चर पाहीला! त्यांनी पॉपकॉर्न पण खाल्लं! कॅरामल! हिरॉईनला पाहून काय म्हणाल्या माहीतेय? स्मार्ट आहे गं!

**अतुलः** (हसून) मग सिनेमा पाहून काय म्हणाल्या त्या?

**सोनालीः** सिनेमा संपला आणि त्या मला म्हणल्या इतके कष्ट केले बिचारीनं वर अंतराळात, पण आता घरी जाऊन चहा कोणाला टाकायला लागणार? तिलाच! बायकांची किंमतच नाही मेल्यांना!
अंतराळातनं एकटीन येणं ठीक आहे गं. म्हणजे अवघडच आहे पण ठीके. पण सलग पस्तीस वर्ष चर्चगेट बोरीवली प्रवास करण्यात आमचं जे झालंय त्याच्यावर पण एक सिनेमा होऊ शकतो. या ‘ग्रॅव्हीटी’ पेक्षाही थरारक! काय बोलणार? अशा रितीनं सॅण्ड्रा बुलक आणि देशपांडे आज्जी यांचा संबंध या ठिकाणी संपला. पण दुसऱ्याच दिवशी सकाळी गंमतच! आज्जींनी दारावरची बेल वाजवली. हातात पेपर होता आणि त्यात एक बातमी. स्वीटी पाटे नावाच्या चाळीसगावच्या मुलीची. त्या म्हणाल्या ‘नुसते पिक्चर कसले दाखवतेस? ही आपली मराठी मुलगी नासा बरोबर काम करते म्हणे!’

**अतुलः** हीच मुलगी आहे आपली पुढची पुरस्कारार्थी स्वीटी पाटे. दोस्तहो, स्वीटी ही तरुण वैज्ञानिक आख्ख्या देशाला अभिमान वाटेल असं काम सध्या करते आहे. नासा या जगप्रसिध्द अमेरिकन अवकाश संशोधन संस्थेसोबत काम करणारी स्वीटी सध्या जर्मन एअरोस्पेस सेंटर इथं महत्वाचं संशोधन करतेय.

**सोनालीः** स्वीटीचं हे काम आपल्या देशातल्या सगळया मुलींसाठी प्रेरणादायी आहे.
नील आर्मस्ट्रॉंग यांच वाक्य थोडंसं बदलून म्हणावंसं वाटतं, ‘वन स्मॉल स्टेप फॉर अ वुमन,

वन जायंट लीप फॉर विमेन'! पाहूया चाळीसगावच्या स्वीटी पाटेच्या कर्तृत्वाची भरारी!

## <u>(AV)</u>

<u>**अतुलः**</u> हा पुरस्कार प्रदान करणार आहेत डी वाय पाटील विदयापीठाचे कुलगुरु आणि ख्यातनाम पीडीयाट्रीक सर्जन डॉ. संजय ओक! मी त्यांना रंगमंचावर येण्याची विनंती करतो.

स्वीटी आत्ता जर्मनीमध्ये महत्वाच्या संशोधन मोहीमेमध्ये असल्यामुळे इथे येऊ शकत

नाही, तिच्या वतीनं हा पुरस्कार तिचे कुटुंबीय स्वीकारतील, त्यांना विनंती करतो की त्यांनी कृपया रंगमंचावर यावं.

**(पुरस्कार प्रदान)**

<u>**अतुलः**</u> हा पुरस्कार मिळाल्यानंतर स्वीटीच्या काय भावना आहेत, जाणून घेऊयात तिच्याच शब्दात थेट जर्मनीहून!

## <u>(AV)</u>

**धन्यवाद!**

-----------------------------AWARD SET 2 ENDS ----------------------------------

------------------------------ANCHOR LINK 3 STARTS---------------------------------

**<u>सोनाली:</u>** आपल्या पुरस्कार सोहळयाची रंगत आणखी वाढवायला आता आपल्यासमोर येतायत आतंरराष्ट्रीय किर्तीच्या ओडीसी नृत्यांगना झेलम परांजपे आणि त्यांची स्मितालयची टीम. नृत्याबरोबर सामाजिक कार्यातही झेलमताईंचं योगदान मोठं आहे. सादर आहे, 'जनी म्हणे'! हा संत जनाबाईंच्या अभंगावर आधारीत त्यांचा आगळा वेगळा नृत्याविष्कार!

## (ANCHORS EXIT)

------------------------------AWARD SET 3 STARTS-----------------------------------

## **विशेष पुरस्कार १:**

**अतुल:** फेअर अॅण्ड लवली प्रस्तुत 'उंच माझा झोका पुरस्कार २०१५' को पावर्ड बाय कोलगेट डेन्टल क्रीम! आता आपण वळूया आजच्या विशेष पुरस्कारांकडे.

**सोनाली:** नुकतंच एक अतिशय छान पुस्तक वाचनात आलं, 'बॉर्न अगेन ऑन द माऊंटन'. ते लिहीलंय, अरुणिमा सिन्हा नावाच्या मुलीनं. मागच्या वर्षी या मुलीनं एवरेस्ट सर केला.

**(अतुल स्मॉल रिस्पॉन्स)**

**सोनाली:** तुम्हाला माहीतेय? एक पाय नसताना तिनं एवरेस्ट सर केला. असं करणारी ती जगातली पहिली महिला आणि पहिली भारतीय व्यक्ती आहे. तिचा अनुभव थक्क करणारा आहे, आणि जिदद नक्कीच असामान्य आहे. अशाच एका जिददीची कहाणी आहे मोनिका मोरेची!

**अतुल:** ट्रेनच्या अपघातात आपले दोन्ही हात गमावलेल्या मोनिकानं त्यानंतर खचून न जाता संकटांचा एवरेस्ट सर केला. सहा महिन्यानंतर पुन्हा आपलं आयुष्य सुरु केलं, परिक्षा दिली, उत्तम मार्कांनी पास झाली. इंटरनेटच्याच भाषेत सांगायचं तर आज तिचा छानसा हसणारा चेहरा अक्षरशः 'वायरल' झालाय. कोणाला ती जिददीचं प्रतिक वाटतेय तर कोणाला धैर्याचं, कोणी तिच्या 'स्पिरीट'चं कौतुक करतंय तर कोणी तिच्या 'फाईट बॅकचं'!

**सोनाली:** पाहूया मोनिकाच्या या प्रवासाची एक धावती झलक!

### **(AV)**

**अतुल:** हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी आपल्या सगळयांची लाडकी, राष्ट्रीय पुरस्कार विजेती अभिनेत्री अमृता सुभाष हिला मी रंगमंचावर येण्याची विनंती करतो. आणि हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी मी मोनिकाला स्टेजवर आमंत्रित करतो.

**(पुरस्कार प्रदान)**

**अतुल:** मोनिका आपलं मनोगत व्यक्त करेल.

**(मनोगत)**

**धन्यवाद!**

## विशेष पुरस्कार २:

**अतुल:** आपल्या देशात सध्या स्वच्छता अभियान सुरु आहे. मला एकाच वेळेला चांगलंही वाटतंय आणि वाईटही!

**सोनाली:** का?

**अतुल:**आपल्याला स्वच्छता ठेवा असं सांगावं का लागतं? आपल्याकडे सवयी आणि गुण याच्यात फरक आहे असं पटवून का दयावं लागतं.

**सोनाली:** म्हणजे?

**अतुल:** म्हणजे उदाहरण दयायचं झालं तर, आपल्या क्षेत्रात नेहमी म्हणतात 'अरे हा अमुक अमुक नट, शूटींगला वेळेवर येतो.' आता वेळ पाळणं हा काही विशेष गुण नाही, ती सवय आहे. तसंच स्वच्छता राखणं ही सुध्दा सवय आहे. गाडगे महाराजांनी आपलं उभ आयुष्य स्वच्छतेला वाहून घेतलं, त्याला पन्नास वर्ष झाली. पण आपल्या पुढच्या पुरस्कारार्थीबददल वाचलं तेव्हा वाटलं, की लोकांच्या मनातली घाण आणि कचरा काढणं, आपल्याला अजूनही शक्य झालेलं नाही.

**सोनाली:** अतुल पेठे यांनी केलेली 'कचराकोंडी' नावाची डॉक्युमेंटरी पाहून मी अशीच हलून गेले होते. एकीकडे जपानसारख्या देशात स्वच्छता कामगारांचा 'हेल्थ इंजिनीअर' म्हणून गौरव केला जातो, त्यांना ,महिन्याला ८००० डॉलर पगार मिळतो आणि आपल्याकडे, त्यांना माणूस म्हणूनही वागवायला आपण कमी पडतो. आपल्या पुढच्या पुरस्कारार्थी, वैशाली बारये, ज्या पुणे महानगरपालिकेत 'हेल्थ इंजीनीअर' आहेत! त्यांच्या कामाची ही चित्रफित आपल्याला देशातलं विदारक वास्तव दाखवेल.

## (AV)

**सोनाली:** वैशालीताईंना हा पुरस्कार देण्यासाठी मी रंगमंचावर आमंत्रित करते ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हटटंगडी यांना. मी वैशाली ताईंना हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी रंगमंचावर आमंत्रित करते.

**(पुरस्कार प्रदान)**

**सोनाली:** वैशाली ताईंना विनंती, त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करावं

**(मनोगत)**

**<u>अतुलः</u>** वैशाली ताई आपण प्लीज थांबावं. आज संपूर्ण महाराष्ट्राच्या वतीनं तुम्हा सगळया हेल्थ इंजीनिअर्सना आम्ही एक वचन देतो. ~~आपण सगळ्यांनी माझ्या मागून हे वचन म्हणावं अशी मी विनंती करतो.~~

**वचनः** मी या देशाचा नागरीक म्हणून माझी, माझ्या परिसराची स्वच्छता राखेन. माझ्या रोजच्या जगण्यात स्वच्छतेला महत्वाचं स्थान देईन. कचरा, घाण टाकणार नाही, कुणालाही टाकू देणार नाही. स्वच्छतेची ही सवय मी जास्तीत जास्त लोकांपर्यंत माझ्या कृतीतून पोचवेन. आपला परिसर आणखी स्वच्छ, आरोग्यपूर्ण आणि सुंदर होण्यासाठी सदैव प्रयत्न करेन. मुख्य म्हणजे, स्वच्छता कर्मचारी जो समाजाचं आरोग्य राखतो, पर्यावरण जपतो त्याला सन्मानाची वागणूक देईन. त्याच्याबददल माझ्या मनात सदैव आदर असेल. धन्यवाद!

-----------------------------AWARD SET 3 ENDS-----------------------------------

-----------------------------AWARD SET 4 STARTS ---------------------------------

## क्रीडाः

**सोनालीः** फेअर अॅण्ड लवली प्रस्तुत 'उंच माझा झोका पुरस्कार २०१५' को पावर्ड बाय कोलगेट डेन्टल क्रीम या आपल्या कार्यक्रमाच्या पुढच्या टप्प्यावर आपण आलो आहोत, या २० सप्टेंबरला एका ऐतिहासिक घटनेला बेचाळीस वर्ष पूर्ण होतायत.

**अतुलः** ऐतिहासिक घटना?

**सोनालीः** खरंतर सामाजिक चळवळच पण हातात फलक किंवा झेंडा घेऊन नाही, तर टेनिसची रॅकेट घेऊन झालेली चळवळ.  वर वर समानतेच्या गप्पा मारायच्या आणि आतून स्त्रियांना दुय्यम लेखायचं या पुरुषी वृत्तीला दणदणीत हादरा बसला या चळवळीनं. क्रीडा जगतात प्रसिध्द असलेल्या 'बॅटल ऑफ सेक्सेस' ला ४२ वर्ष पूर्ण होतील आता.  एक पुरुष टेनिसपटू विरुध्द एक महिला टेनिसपटू असा झालेला हा सामना जगभर गाजला आणि बऱ्याच गोष्टींचा निकाल लागलाच! बिली जेन किंग या स्त्रीनं या लढतीत बॉबी रिग्ज या पुरुषाला सरळ सेटसमध्ये हरवलं. एक लाख डॉलरचं बक्षीस जिंकल्यावर ती काय म्हणाली माहीतेय, 'मी आजची मॅच जिंकले नसते तर आम्ही बायका पन्नास वर्ष मागे फेकल्या गेलो असतो. मी हरले असते आणि सगळया स्त्रियांचा स्वाभिमान हरला असता.'

**अतुलः** या अशा प्रतिकात्मक घटना फार महत्वाच्या असतात, कारण त्या येणाऱ्या अनेक पिढयांना वेगळी दिशा देतात. मात्र बॅटल ऑफ सेक्सेस आजही चालू आहे. स्त्रीला आजही ही लढाई लढावी लागतेय, आपली शक्ती आणि स्थान दोन्ही दाखवून दयावं लागतंय ही दुर्दैवाची गोष्ट. असो, बरं मला सांग ३४ मिनिटात तू किती अंतर जाऊ शकतेस?

**सोनालीः** चालत फारफार तर एक किलो मीटर आणि पळत साधारण दोन अडीच किलोमीटर.

**अतुलः** आत्ता इथं बसलेल्या लोकांमध्ये एक मुलगी आहे, जी चौतीस मिनिटात पाच नाही, सात नाही, दहा किलोमीटर पळू शकते, नव्हे आधीच पळालीये. म्हणजे एक किलोमीटर, जवळपास सोडतीन मिनिटाहून कमी वेळेत!

**सोनालीः** बाप रे ऐकूनच धाप लागली!

**अतुलः** १० किलोमीटर धावण्याचा राष्ट्रीय विक्रम नावावर असलेली, भारताला कॉमनवेल्थ गेम्स मध्ये

अॅथलेटिक्सचं पदक मिळवून देणारी, आणि आपल्या सगळयांची लाडकी असलेली सावरपाडा एक्सप्रेस अर्थात कविता राऊत! आपली क्रीडा क्षेत्रातली पुरस्कारार्थी! चला पाहूया, तिच्या स्वप्नांची धाव कशी सुरु झाली!

## **<u>(AV)</u>**

**<u>सोनालीः</u>** तिला आज प्रदान होणार आहे क्रिडा विभागासाठीचा उंच माझा झोका पुरस्कार!

**<u>अतुलः</u>** हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी मी रंगमंचावर आमंत्रित करतो आपल्या देशाचे माजी हॉकी कर्णधार, हॉकी प्रशिक्षक आणि देशातल्या प्रत्येक हॉकीपटूचे रोल मॉडेल धनराज पिल्ले.

**<u>सोनालीः</u>** कविता आजवर रनिंगसाठी तुला असंख्य मेडल्स मिळालीयेत पण हा असा पुरस्कार आहे जो तू शांतपणे चालत येऊनही स्वीकारु शकतेस. स्वागत करुया, कविता राऊतचं.

**(पुरस्कार प्रदान)**

मी कविताला विनंती करते की तिनं मनोगत व्यक्त करावं!

**(मनोगत)**

**धन्यवाद!**

## पर्यावरणः

**सोनाली:** अनेक दशकं खरंतर अनेक शतकं बायकांना घरात बांधून ठेवण्यात आपल्या समाजानं धन्यता मानली. उपकरणं बदलली, आधुनिक झाली, वरवंटया ऐवजी मिक्सर आला, स्टोव्हच्या ऐवजी पाईप्ड गॅस आला, पण त्यात रहाणारी स्त्री मात्र तशीच राहीली, उलट अजून अजून जबाबदाऱ्या तिच्यावर पडत गेल्या, आणि आयुष्य म्हणजे काही जाहीरात नाही ज्यात काहीही झालं तरी बाई आपली छान कपडे घालून हसतच असते. तिलाही किती त्रास होत असेल, किती कष्ट पडत असतील, सगळं मॅनेज करताना, याचा विचार करत नाही कोणी!

**अतुलः** थोडक्यात चुलीचा फॉरमॅट बदलला पण चूल तशीच राहीली. ग्रामीण भागात तर आजही चुलीवर स्वयंपाक होतो. लाकडासाठी वणवण भटकावं लागतं, फुंकण्यानी फुंकून फुंकून स्त्रिया रडकुंडीला येतात, डोळयात धूर जाऊन अनेक स्त्रिया आपली दृष्टी गमावतात, फुफुस्सांचे विकार जडतात, पण मग डॉ. प्रियदर्शनी कर्वे यांच्यासारखी आधुनिक दृष्टीची स्त्री याच समस्येवर उपाय म्हणून आरती संस्थेतर्फे निर्धूर चूलीचा उपक्रम राबवते. वडील डॉ. आनंद कर्वे यांच्यासोबत पर्यावरणासारख्या महत्वाच्या विषयावर त्यांनी गेली अनेक वर्ष संशोधन केलं आहे. आज भारतलक्ष्मी सारख्या त्यांच्या स्टोव्ह नं सातारा जिल्हयातलं नांदल सारखं आख्खं गाव धूरमुक्त केलंय.

**सोनालीः** आता आपण आकडयांच्या भाषेत सुध्दा जाणून घेऊया, या संशोधनानं, इंधन खर्चात तीस टक्के, धुरात ऐंशी टक्के आणि स्वयंपाकाच्या वेळेत तीस टक्के कपात झालीये ! दरवर्षी धुराशी
निगडीत पन्नास हजार महिला आणि बालकांचे मृत्यू होणाऱ्या आपल्या देशात प्रियदर्शनी कर्वे यांचं योगदान म्हणूनच फार मोलाचं आहे. खऱ्या अर्थानं इकॉनॉमी आणि इकॉलॉजी फ्रेंडली अशा दोन्ही स्तरावर महत्वाचं संशोधन करणाऱ्या प्रियदर्शनी कर्वे, यांना यंदाचा पर्यावरणाचा उंच माझा झोका पुरस्कार! पाहूया त्यांच्या कामाची एक झलक!

## (AV)

**अतुलः** हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी मी रंगमंचावर आमंत्रित करतो अच्युत गोडबोले
यांना. अच्युत गोडबोले यांनी मानसशास्त्रा पासून कॉर्पोरेट कंपन्यांपर्यंत आणि आयटीपासून अर्थकारणापर्यंत

अनेक विषयांवर अतिशय अप्रतिम अभ्यासपूर्ण पुस्तकं लिहीली आहेत. मी प्रियदर्शिनी कर्वे यांना पुरस्कार स्वीकारण्यासाठी रंगमंचावर येण्याची विनंती करतो.

**(पुरस्कार प्रदान)**

**अतुलः** मी डॉ. कर्वे यांना विनंती करतो की त्यांनी आपलं मनोगत व्यक्त करावं!

**(मनोगत)**

धन्यवाद!

------------------------------AWARD SET 4 ENDS ----------------------------------

------------------------------ANCHOR LINK TO ACT 5 ---------------------------------

**सोनालीः** यानंतर वेळ आहे एका अनोख्या सादरीकरणाची. दोन बहीणी, एक राष्ट्रीय पुरस्कार विजेती पार्श्वगायिका आणि दुसरी नुकतंच वर्ल्ड अल्बम मध्ये भारताचं प्रतिनिधत्व केलेली प्रख्यात शास्त्रीय गायिका. मी सांगतेय, आपल्या सगळयांचा लाडक्या बेला शेंडे आणि सावनी शेंडे यांच्याबददल. या दोघी आता आपल्यासमोर घेऊन येतायत आराधना!

(ANCHORS EXIT)

-------------------------------------ACT 5 ENDS ---------------------------------------

------------------------------AWARD SET 5 STARTS ---------------------------------

## संस्थाः

**<u>सोनालीः</u>** तुम्हाला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि त्यांची पत्नी मिशेल ओबामा यांचा रेस्टॉरेंटचा किस्सा माहीतेय ना? किस्सा किती खरा खोटा माहीत नाही, पण त्याचा अर्थ फार सूचक आहे.

दोघं एक दिवस एका रेस्टॉरेंट मध्ये गेले. तिथे रेस्टॉरंटचा मालक या दोघांनाही भेटला. तो भेटून गेल्यानंतर मिशेल म्हणाल्या की हा आणि मी तरुण असताना एकमेकांच्या प्रेमात होते. त्यावर बराक ओबामा म्हणाले की बघ त्याच्याशी लग्न झालं असतं तर या रेस्टॉरेंटची मालक झाली असतीस. क्षणाचाही वेळ न घालवता त्या म्हणाल्या 'नाही. त्याच्याशी लग्न केलं असतं तर **"तो"** अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष झाला असता!'

**<u>अतुलः</u>** त्यांच्या या हजरजबाबीपणावर म्हणे बराक ओबामा कौतुकानं हसले. आपल्या आयुष्यातलं स्त्रीचं महत्व ओळखणारे आणि त्याला मान देणारे असे पुरुष क्वचितच पहायला मिळतात.

ही समानता बऱ्याच जणांना सहन होत नाही. बघा ना दिवसेंदिवस स्त्रियांवरचे अत्याचार वाढतायत, बाहेर तर सोडाच पण घरात तिचा प्रचंड छळ होतोय. कधी मुलगा व्हावा म्हणून मारलं जातं, कधी पैसे आणले नाहीत म्हणून, कधी नवरा व्यसनी आहे म्हणून, कधी आर्थिक परिस्थीती बेताची म्हणून.

**<u>सोनालीः</u>** म्हणूनच पदमा गोळे यांनी तेव्हा लिहीलेली कविता आजही तितकीच रिलेट होते, त्या म्हणतात,

"सीतेपुढे एकच ओढली रेषा लक्ष्मणानं, तीनं ती ओलांडली आणि झालं रामायण.

आमच्यापुढे दाही दिशा लक्ष्मणरेषा. ओलांडाव्याच लागतात.

रावणांना सामोरं जावंच लागतं! एवढंच कमी असतं, कुशीत घेत नाही भुई दुभंगून!"

अशाच असंख्य स्त्रियांना रावणांच्या तावडीतून सोडवणाऱ्या, स्त्री अत्याचार विरोधी लढयात मोलाचं स्थान असणाऱ्या, स्त्रियांना जगण्याचं भान आणि लढण्याचं बळ देणाऱ्या नागपूरच्या डॉ. सीमा साखरे यांच्या 'स्त्री अत्याचार विरोधी परिषद या संस्थेला दिला जातोय यंदाचा संस्थात्मक कार्यासाठीचा 'उंच माझा झोका पुरस्कार'! पाहूया त्यांच्या संस्थेची ही एक झलक!

**<u>(AV)</u>**

**<u>अतुलः</u>** त्यांना हा पुरस्कार प्रदान करतील मानसोपचार तज्ज्ञ, लेखक आणि मानसिक आरोग्यासारख्या विषयावर महत्वाचं काम करणारे, इन्स्टीटयूट ऑफ सायकोलॉजिकल हेल्थ चे संस्थापक, संचालक डॉ. आनंद नाडकर्णी. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी डॉ. सीमा साखरे यांनी रंगमंचावर आमंत्रित करतो.

**(पुरस्कार प्रदान)**

मी सीमाताईंना दोन शब्द बोलायची विनंती करते.

**(मनोगत)**

धन्यवाद!

## <u>जीवनगौरव पुरस्कार</u>

**<u>अतुलः</u>** फेअर अॅण्ड लवली प्रस्तुत ‘उंच माझा झोका पुरस्कार २०१५’ को पावर्ड बाय कोलगेट डेन्टल क्रीम या सोहळयात शेवटचा आणि तितकाच महत्वाचा पुरस्कार, अर्थात जीवनगौरव पुरस्कार.

**<u>सोनालीः</u>** एखादी व्यक्ती आपल्या उदात्त विचारांनी किती जणांचं आयुष्य समृध्द आणि अर्थपूर्ण करु शकते याचं जिवंत उदाहरण म्हणजे मीराताई लाड. शांतिवन पनवेल इथं राजीव रंजन आधार केंद्र स्थापन करुन वयस्कर आणि शारिरीक दृष्टया अपंग व्यक्तींची काळजी घेणं, मानसिक संगोपन करणं यालाच त्यांनी आपलं जीवीतकार्य मानलं. मला मीराताईबददल सांगताना पु लं च्या पत्रातलं एक सुंदर वाक्य आठवतं, ते त्यांच्या मित्राला म्हणतात, आपलं जीवन मातीमोल वाटण्याचं सुध्दा एकच कारण, की मला दुसऱ्याच्या जीवनात सुख कसं देता येईल याचा विचार अस्वस्थ करत नाही. आणि तो ज्यांना अस्वस्थ करतो, ते भाग्यवान. कारण ते जीवनाला अर्थ आणतात. मीराताई अशाच भाग्यवंतापैकी एक.

**<u>अतुलः</u>** त्यांची हीच अस्वस्थता शेकडो लोकांचा आधार झाली. कुणाला हक्काचं छप्पर मिळालं, कुणाला मायेचा घास. कुणाला प्रेमाची सावली मिळाली, कुणाला जन्मभराचे सोबती मिळाले. खरोखरंच त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू आणि डोळयातली आस्था नवी दृष्टी देणारी आहे. राजीव रंजन आधार केंद्र त्यांनी सुरु केलंच शिवाय शांतिवनातील कुष्ठरोग निवारण केंद्र, निसर्गोपचार केंद्र, वाचनालय, निवासीशाळा या सगळया उपक्रमात त्यांचा सक्रीय सहभाग आहे.

**<u>सोनालीः</u>** पाहूया मीराताई लाड यांच्या कामाची एक झलक!

## <u>(AV)</u>

**<u>अतुलः</u>** त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी मी रंगमंचावर आमंत्रित करतो महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री माननीय श्री विनोद तावडे यांना. मी आदरणीय मीराताई लाड यांना विनंती करतो की त्यांनी पुरस्कार स्वीकारण्यासाठी रंगमंचावर यावं.

**(पुरस्कार प्रदान)**

**<u>अतुलः</u>** मी मीराताईंना आपलं मनोगत व्यक्त करावं, अशी विनंती करतो.

**(मनोगत)**

धन्यवाद!

------------------------------AWARD SET 5 ENDS ---------------------------------

------------------------------ANCHOR CLOSING LINK --------------------------------

**<u>अतुलः</u>** फेअर ॲण्ड लवली प्रस्तुत 'उंच माझा झोका पुरस्कार २०१५' को पावर्ड बाय कोलगेट डेन्टल क्रीम या सोहळयात आता शेवटचे काही क्षण. आजच्या या सोहळयात स्त्रियांचा सन्मान झाला, त्यांच्या कलागुणांचा अविष्कार झाला, त्यांच्या सामर्थ्याची प्रचिती आली आणि त्यांच्याविषयी जागरुकताही निर्माण झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आम्ही आपल्याला एक आवाहन केलं होतं, की हा कार्यक्रम लक्षपूर्वक पहा. कारण या पुरस्कारार्थीपैकी कोणीतरी आपल्या आसपास रहात असेल, आपल्या जिल्हयात, आपल्या शहरात आपलं काम निस्वार्थीपणे करत असेल. सांगायचा उददेश हा की जरा आपल्या आजूबाजूला पाहा, तुम्हाला अशा असंख्य स्त्रिया दिसतील, ज्यांचही काम आणि योगदान समाजासाठी फार मोलाचं आहे. अनेक घरचं घरकाम करणाऱ्या बाई, फुलवाल्या आज्जी, ट्रॅफिक कॉन्स्टेबल, कॉर्पोरेट प्रोफेशनल, शिक्षिका, वकील, डॉक्टर आणि अभिनेत्री सुध्दा. एकदा जोरदार टाळया आपल्या आजूबाजूला असलेल्या या सगळया स्वाभिमानी स्त्रियांसाठी.

**<u>सोनालीः</u>** थँक यू अतुल, अशा प्रोत्साहनानं खरचं बरं वाटतं! सांगण्याचा मुददा इतका च की आपल्या सगळयांच्या आजूबाजूला अशा मुली असतात, अशा स्त्रिया असतात, ज्या रोजचा संघर्ष करतायत, ज्या आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपडतायत. त्यांना गरज आहे आपल्या एका धक्क्याची. त्यांना त्यांच्या स्वप्नांच्या झोक्यावर बसवून आपल्या प्रोत्साहनाचा, मदतीचा, आणि आपुलकीचा एक धक्का देऊया, त्यांना सांगूया की त्यांची काळजी करणारं कोणीतरी आहे. त्या जे काम करतायत ते मानाचं आणि महत्वाचं आहे. आम्हाला खात्री आहे, एकदा हा सकारात्मक धक्का आपण दिला की त्यांच्या स्वप्नांचा झोका कधीच मागे येणार नाही, तो उंचच उंच भरारी घेत राहील, आणि आपल्याला पुढच्या वर्षी पुरस्कारार्थीची यादी आणखी वाढवावी लागेल!

कार्यक्रमाची सांगता करण्याआधी यासाठी पडदयामागे काम करणाऱ्या टीमची ओळख.

कार्यक्रमाची संहिता लेखन : क्षितिज पटवर्धन,

पुरस्कारार्थींचा रिसर्चः सुगंधा लोणीकर,

ध्वनिचित्रफित लेखनः  अरविंद जगताप,

ध्वनिचित्रफित दिग्दर्शनः केशव पेडणेकर, एकदा जोरदार टाळया या सर्वांसाठी.

**<u>अतुलः</u>** यानंतर आमचे प्रेझेंटींग स्पॉन्सर फेअर अॅण्ड लवली, को पावर्ड  बाय कोलगेट डेन्टल क्रीम! स्पेशल पार्टनर गिटस इन्स्टंट मिक्सेस, असोसिएट स्पॉन्सर्स डीएसके ड्रीम सिटी, संतूर सोप, रेलिस्प्रे, पाँडस ड्रिमफ्लॉवर टाल्क, केप्र फूडस, पी एम सी बँक, महिंद्रा सेंच्युरो या सगळयांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. पुन्हा भेटूया पुढच्या वर्षीच्या सोहळयासाठी, तोवर

**<u>अतुल आणि सोनालीः</u>** धन्यवाद!

------------------------------ CLOSING LINK ENDS ------------------------------------

---------------------------------------- THE END ----------------------------------------